**L. A. BILL No. LIII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT AND THE MAHARASHTRA PROHIBITION OF OBSCENE DANCE IN HOTELS, RESTAURANTS AND BAR ROOMS AND PROTECTION OF DIGNITY OF WOMEN (WORKING THEREIN) ACT, 2016.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३.**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५१ चा २२. २०१६ चा महा. १२.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यांमध्ये आणखी सुधारणा

करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम यामधील सुधारणा.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश, "पोलीस अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (६अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः— १९५१ चा २२.

"(६अअ) "प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" याचा अर्थ, कोणत्याही हॉटेलमध्ये, उपाहारगृहामध्ये किंवा मद्यपान कक्षामध्ये (बार रुम) वाद्यांचा किंवा ध्वनिमुद्रण साधनांचा वापर करून संगीतासह किंवा संगीताशिवाय एकतर वैयक्तिकरीत्या किंवा गटामध्ये केले जाणारे गाण्याचे सादरीकरण, असा आहे;".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**३.** पोलीस अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(क) खंड (डब्ल्यु) मधील, उप-खंड (१) मध्ये, "सार्वजनिक मनोरंजनाचे" या मजकुराआधी, "कोणतेही हॉटेल, उपाहारगृह किंवा बार ज्यामध्ये प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) सादर केले जाते त्या खेरीज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) खंड (डब्ल्यु-अ) मधील, उप-खंड (१) मध्ये, "गाण्याच्या" या मजकुराआधी "कोणत्याही हॉटेलमध्ये, उपाहारगृहामध्ये किंवा बारमध्ये सादर केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) या खेरीज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ याची सुधारणा.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २ ची सुधारणा.

२०१६ चा महा. १२.

**४.** महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(७अ) "प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" याचा अर्थ, कोणत्याही हॉटेलमध्ये, उपाहारगृहामध्ये किंवा मद्यपान कक्षामध्ये (बार रुम) वाद्यांचा किंवा ध्वनिमुद्रण साधनांचा वापर करून संगीतासह किंवा संगीताशिवाय एकतर वैयक्तिकरीत्या किंवा गटामध्ये केले जाणारे गाण्याचे सादरीकरण, असा आहे;".

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, "नृत्ये" या मजकुरानंतर, "किंवा प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सन १९५१ चा २२) याचे कलम ३३ हे, सार्वजनिक ठिकाणच्या रहदारीचे नियमन करण्यासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आयुक्ताला किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याला नियम करण्याचे अधिकार प्रदान करते. उक्त अधिनियमाच्या कलम ३३ च्या पोट-कलम (१) मधील खंड (डब्ल्यु-अ) हे, सार्वजनिक मनोरंजनासाठी संगीत, नृत्य किंवा इतर सादरीकरणांचे लायसने देण्याचे किंवा नियंत्रण करण्यासाठीचे नियम तयार करण्याचे अधिकार प्रदान करते. उक्त अधिनियमाच्या कलम ३३ च्या पोट-कलम (१) मधील उक्त खंड (डब्ल्यु-अ) अन्वये केलेल्या सार्वजनिक मनोरंजन नियमांच्या तरतुदींनुसार हॉटेल, उपाहारगृहे किंवा मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील ऑर्केस्ट्रा व प्रत्यक्ष संगीत सादरीकरणे यासाठी देखील लायसने दिली जातात.

२. असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ (२०१६ चा महा. १२) (यात यापुढे ज्याचा निर्देश "अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम" असा केला आहे) या अन्वये हॉटेल, उपाहारगृहे किंवा मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील नृत्य सादरीकरणांवर लादलेल्या निर्बंधांमधून पळवाट काढण्यासाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाअन्वये दिलेल्या प्रत्यक्ष संगीत सादरीकरणांच्या (ऑर्केस्ट्राच्या) लायसनांचा वापर, अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियमाअन्वये हॉटेल, उपाहारगृहे किंवा मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील नृत्य सादरीकरणांच्या लायसनांना पर्याय म्हणून केला जात आहे. या प्रथेला आळा घालण्यासाठी, प्रत्यक्ष संगीत सादरीकरणे (ऑर्केस्ट्रा), अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियमाच्या कक्षेत आणणे आणि हॉटेल, उपाहारगृहे किंवा मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील प्रत्यक्ष संगीत सादरीकरणांची (ऑर्केस्ट्राची) लायसने पोलीस अधिनियमाच्या कक्षेतून वगळणे आवश्यक आहे असे शासनास वाटते.

म्हणून, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाची कलमे २ व ३३ आणि अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियमाची कलमे २ व ३ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>
दिनांक ५ जुलै, २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**<br>
मुख्यमंत्री.

**सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ५३.— महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ यातील उतारे)**

**(सन १९५१ चा महाराष्ट्र क्रमांक २२)**

**१.** ते **३२.** *** *** ***

सार्वजनिक ठिकाण, इत्यादींमध्ये रहदारीच्या विनियमासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी नियम करण्याचा अधिकार.

**३३.** (१) या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात आयुक्तास, उपरोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात [ या कलमाचे खंड (क), (ख), (घख), (ङ), (छ), (द), (न) आणि (प) यांखाली येणाऱ्या बाबी सोडून ] जिल्हा दंडाधिकाऱ्यास आणि या पोट-कलमाचा खंड (म) धरून उपरोक्त खंडाखाली येणाऱ्या बाबींच्या संबंधात पोलीस अधीक्षकास त्यांच्या प्रभाराखाली क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात पुढील गोष्टींच्या संबंधात, या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम किंवा आदेश करता येतील, त्यात फेरफार करता येतील किंवा ते विखंडित करता येतील :—

(क) ते (फ) *** *** ***

(ब) (एक) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागेला किंवा सार्वजनिक करमणुकीच्या जागेला लायसन देणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे ;

(दोन) व (तीन) *** *** ***

(बक) (एक) सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता व नीतिमत्ता यासाठी किंवा जनतेच्या हिताच्या दृष्टीने विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादात्मक गोष्टी वगळून, सार्वजनिक मनोरंजनासाठी मेळे व तमाशे यांसहित गायनाच्या, नृत्याच्या, नकलांच्या किंवा रंगभूमीविषयक किंवा इतर प्रयोगांना लायसन देणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे ;

(दोन) ते (चार) *** *** ***

(बख) *** *** ***

(भ) व (म) *** *** ***

(१-क) व (१-ख) *** *** ***

(२) ते (८) *** *** ***

**३३क.** *** *** ***

**३४.** ते **१६८.** *** *** ***

**अनुसूची.** *** *** ***

**[ महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यातील उतारे ]**

**(सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनयम क्रमांक १२)**

**१.** व **२.** *** *** ***

हॉटेल, उपाहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रूम) याकरिता परवानगी.

**३.** कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये लायसन घेतल्याखेरीज आणि हा अधिनियम व त्याखालील नियम याद्वारे लादलेल्या शर्ती व निर्बंधांचे अनुपालन केल्याखेरीज, जेथे नृत्ये आयोजित केली जातात असे हॉटेल, उपाहारगृह, मद्यपान कक्ष (बार रूम) किंवा अन्य कोणतेही ठिकाण सुरू करता येणार नाही.

**४.** ते **१६.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३.]**

**[महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.